१३

गुढी पाडवा आणि संभाजीराजेंची हत्या समज गैरसमज...

डॉक्टर सतीश कदम तुळजापूर

छत्रपती संभाजीराजांच्या मृत्यूपुर्वी किमान ५०० वर्षे अगोदरपासून गुढीपाडवा साजरा केला जातोय..

गुढी पाडवा आला की, कधीही संभाजीराजांची जयंती पुण्यतिथी साजरा न करणारा एक वर्ग उठतो आणि राजांचा गुढीशी संदर्भ जोडून हिंदूच्या मुळावर घाव घालण्याचा प्रयत्न करतो. वास्तविक पाहता गुढीपाडवा हा शालिवाहन शकाचा वर्षातील पहिला दिवस आणि संभाजीराजांची पुण्यतिथि ११ मार्च मराठी महिन्यांनुसार फाल्गुन कृ. १५ म्हणजेच आमवस्या. याचे मूळ माहीत नसल्याने नवीन पिढीही यांच्या अपप्रचाराला बळी पडताना दिसून येते. इतिहासाच्या कुठल्याही पुस्तकात राजांच्या हत्येनंतर गुढी उभी करण्याचा प्रघात सुरू झाला असा कुठलाही संदर्भ नाही. यासाठी खुले आवाहन दिलेतरी ते वावगे ठरणार नाही. संभाजीराजेंच्या हत्त्येपूर्वी किमान ५०० वर्षे अगोदरपासून गुढीपाडवा साजरा केला जातो.

वाद घालण्यापेक्षा गुढी पाडव्याचे पुढील संदर्भ वाचल्यास यामागची सत्यता ध्यानात येऊ शकेल.

१. गुढी आणि शंकरपार्वती- डॉ. आ.ह. साळुंके*

कानडी भाषेतील गुढीचा उल्लेख

महात्मा बसवेश्वर (कालखंड ११०५ ते ११६७)

ओडेयरू बंदडे गुडी तोरणव कट्टी । याचा अर्थ जेष्ठांचे म्हणजेच शरणाचे आगमन होता गुढ्या उभारून तोरणे बांधा.

२. चोखामेळा (कालखंड १२७० - १३५०)

टाळी वाजवावी, गुढी उभारावी ।
वाट ही चालावी पंढरीची ।।

३. संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६) अध्याय ४, ६ आणि १४
अवधर्माची अवधि तोडी । दोषांची लिहिली फाडी ।
सज्जनाकरवी गुढी । सुखाची उभवि ।

४. लिळा चरित्र - म्हाइंभट (१२७८- १३००)
चौक रंगमाळीका भरविलिया, गुढी उभविली ।।

५. संत एकनाथ (१३३३ - १५९९)
उभावूणी सायुज्याची गुडी । परापरथडी पावले ।।

६. संत जनाबाई (१२५८ -१३५०)
राया प्राप्ती जाला पट । गुडी उभवि वाशिष्ठ ।।

७. तुकाराम (१६०८- १६५०)
पुढे पाठविले गोविंदा गोपाळा । देऊनी चपळा, हाती गुढी ।।

या संतांच्या अभंगाबरोबरच शिवकालीन संदर्भातही गुढी पाडव्याचा उल्लेख अनेकवेळा आलेला आहे.

१. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड कृ. २ - केळकर आणि आपटे द.वि. शिवचरित्र कार्यालय पुणे, लेखांक १६२५ , पृष्ठ कृ.४७७

चैत्र शु. ८, शके १५९६, ४ एप्रिल १६७४

इंग्रजांचा दुभाषी व वकील नारायण शेणवी मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला पत्र लिहितो की, 'मंगळवार दि. २४ मार्च १६७४ रोजी रायरी (रायगड) ला पोहोचलो. त्याच दिवशी निराजी पंडिताची भेट घेण्याकरिता पाचाड गावी गेलो. तेव्हा निराजी

गडावर होता असे समजले. मध्यंतरी निराजी पंडित गुढी पाडव्याकरिता (२८ मार्च १६७४) आपल्या घरी आला. दुसऱ्या दिवशी त्याने मला आपल्या बरोबर नेऊन एका प्रशस्त घरात माझी सरबराई केली. तेथे मी आणखी पाच दिवस राहिलो, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात गुढी पाडव्याचा सण साजरा केला जात होता हे यावरून स्पष्ट होते.

२.मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध - डॉ. जयसिंगराव पवार, पृष्ठ कृमांक १३५

२ मार्च १७०० ला छत्रपती राजारामांचे निधन झाल्यानंतर महाराणी ताराबाईनी मुद्दामहून मुहूर्त काढून आपले चिरंजीव दुसरे शिवाजी यांना १० मार्च १७०० ला चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या म्हणजे गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर मंचकारोहण केले. शिवरायांच्या सूनबाई महाराणी ताराराणीसाहेबांना गुढी पाडव्याच्या सणाचे महत्त्व ज्ञात होते. म्हणजे त्याही कालखंडात गुढी पाडव्याचा सण एक मुहूर्त म्हणून मानला जात होता हे यावरून स्पष्ट होते.

३. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड कृमांक २० - वि. का. राजवाडे, लेखांक १७६, पृष्ठ कृमांक २३९

प्रा ।। वाई येथील कौल, एकूण कलम १

शके १५५२ मध्ये कार्तिक पौर्णिमे ग्रामस्त कसबे वाई यांनी ग्रहणकाली कडत जोसी को । मा।र (मजकूर) यास प्रतिवर्षी पासोडी एक व गहू गुढीयाचे पाडव्यास कुडव एक देऊ म्हनोन पत्र लेहून दिलहे यास वर्षे आज ता ।। १४८ होतात कलम१. खरंतर हा संदर्भ इसवी सन १६३० म्हणजे शिवरायांच्या जन्माच्यावेळचा म्हणजे त्यांच्या कारकिर्दीपूर्वीचा असल्याने शिवकलखंडापूर्वीही गुढी पाडवा साजरा केला जात होता हे यावरून स्पष्ट होते.

४. शिवचरित्र साहित्य खंड १ - पोतदार द. वा. व इतर. लेखांक ४१, पृष्ठ कृमांक ५९ ते ६५.

मार्गशीष शुद्ध १ विरोधीनाम सवंस्तर शके १५७१ अथवा सुहूर सन खसेन अलफ म्हणजे २४ नोव्हेंबर १६४९ , सोमवार दिवसी राजेश्री नीलकंठराऊ यासी ....

कासाराचे घरी गुढीयाचा पाडवा व चैत्री पुनीव व स्रावणी पिणीव व कुलधर्म करील तेथे हाक उतपन फळावर येईल तो तिघी जणी वाटोण घेणे ....

५. गुढी आणि शिवपार्वती- डॉ. आ.ह. साळुंके

नवीन वर्ष साजरा करण्याचा त्या त्या भागातील विविध पद्धती आहेत. कर्नाटक, आंध्र आणि तेलंगणात याला उगादि, राजस्थान व हरियानात याला थपना, हिमाचलमध्ये चैत्ती तर कश्मीरमध्ये नववर्षाला नवरेह म्हणतात. तर याचदिवशी शालिवाहन शक नावाने कालगणना सुरू झाली. चैत्र म्हणजे नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी गुढी उभी करण्याची पद्धत रूढ झाली. फार पूर्वी कुठल्याही फार मोठ्या यशप्राप्तीनंतर गुढी उभी केली जाऊ लागली. गुढी हा शब्द स्त्रीलिंगी असून पार्वतीच्या रूपातील तो संपूर्ण देह आहे.

६. मराठी विश्वकोश खंड क्रमांक ५

हा दिवस हिंदूंच्या साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असून दक्षिण भारत आणि महाराष्ट्रात याचदिवशी शालिवाहन शकाला इसवी सन ७८ मध्ये सुरुवात झाली असून शालिवाहन हा सातवाहनांचा अपभ्रंश असावा. परकीय शकावर शालिवाहनांनी विजय मिळविला तो दिवस आणि वसंत ऋतूचे आगमन म्हणूनही गुढी पाडवा साजरा केला जातो.

७. भारतीय संस्कृती कोश - खंड क्रमांक ३

चैत्र शुद्ध प्रतिपदेला लोक वर्ष प्रतिपदाही म्हणतात. याच दिवशी गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. याचदिवशी ब्रम्हदेवाने जगाची निर्मिती केली असे मानले जाते. अशा प्रकारे हिंदूंच्या नववर्ष्याच्या स्वागतासाठी गुढी उभी केली जाते. गुढी या शब्दाचा दूसरा अर्थ ध्वज अथवा पताका असाही होतो. शालीवहान म्हणजेच सातवाहनाची सत्ता ज्या भागात होती त्या भागात गुढीची प्रथा सुरू झाली. गुढीऐवजी भगवा झेंडा उभा केला जातो ते अयोग्य वाटते. कारण झेंड्याला खाली उतरून विसर्जन करणे कुठल्याही राजधर्मात बसत नाही. याशिवाय गुढी कशी उभी करावी हा विषय वेगळा असलातरी अलीकडे या संपूर्ण विवेचनात कुठेही संभाजीराजांच्या मृत्यूनंतर गुढी उभी करण्यास सुरुवात झाली असे म्हणणे किती आधारहीन आहे हे स्पष्ट होते. छत्रपती संभाजी राजेंच्या हत्त्येनंतर मुद्दामहून गुढी उभी केली जाऊ लागली हे म्हणणे मूर्खपणाचे असून त्याबाबतचा कुठलाही अस्सल संदर्भ उपलब्ध नाही. खरंतर हा खोडसाळपणा आहे.

त्यामुळे गुढी पाडव्याचा सण म्हणजेच हिंदूंच्या नवीन वर्षाचे स्वागत असून ते कसे साजरे करावे हे ज्याचे त्याने ठरवावे. मात्र गुढीचा संबंध छत्रपती संभाजी

महाराजांच्या हत्येशी जोडणे म्हणजे इतिहासाची मोडतोड आहे. 'राजांचा शिरच्छेद करून डोके मिरविल्याचे प्रतीक म्हणून गुढी उभारण्यास एका ठराविक पंडितांनी सुरुवात केली' हे म्हणणेही साफ चुकीचे असून राजांची हत्या झाली त्यावेळी महाराष्ट्रात असा कोणता महान पंडित होऊन गेला की अगदी संपूर्ण मराठा माणूस त्याचे ऐकून गुढी उभा करू लागला ? दुसरे म्हणजे राजांची हत्या पाडव्याचा आदल्या रात्री म्हणजेच अमावास्येला झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी असे कोणते दळणवळनाचे साधन होते की एका रात्रीत गुढी उभी करण्याचा संदेश महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात गेला?

दुसरा विषय असा की, राजांची हत्या कुठल्यातरी हिंदूच्या अर्थात, ब्राम्हणाच्या सांगण्यावरून झाली यालाही कुठलाच आधार नाही, याउपर औरंगजेबाच्या दरबारी इतिहासकारांनी याबाबत पुढील माहिती लिहून ठेवलेली आहे, त्याचाही थोडासा परामर्श घेणे गरजेचे आहे.

१. मासिरे अलामगिरि मूळ लेखक साकी मुस्तैदखान (भाषांतर सेतुमाधव पगडी) – मराठे व औरंगजेब , १९६३, पृष्ठ क्रमांक ४१

त्याला (संभाजीला) जीवंत ठेवण्याऐवजी त्याला नाहीसा (इफनाय) करणे बरे असे बादशहाचे मत झाले. धर्मशास्त्रज्ञांनी म्हणजे काझींनी फतवा दिला. त्याचबरोबर अमीर उमरवानीही हाच सल्ला दिला. त्यास अनुसरून त्या लुटारूचा (काते अल्तरिक) वध करणे आवश्यक आहे असे ठरविण्यात आले. त्यानुसार ११ मार्च १६८९ ला संभाजी आणि कवि कलशला तल्वारीच्या योगे नरकात (दरके असफल) पाठविण्यात आले. (काफरबच्चा जहन्नमी रफ्त)

२. तारीखे दिल्कुशा – भीमसेन सक्सेना (औरंगजेबाच्या तोफखान्यातील एक अधिकारी) पृष्ठ क्र. ९९

बादशहाने प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले. संभाजीच्या डोळ्यात सळई फिरविण्यात आली. दोन तीन दिवसानंतर संभाजी आणि कविकलस यांचा शिरच्छेद करण्यात आला. (११ मार्च १६८९)

३. श्री छत्रपती संभाजी महाराज – वा. सी. बेंद्रे पृ. ६६८

११ मार्च १६८९ ला संभाजीराजांना हाल हाल करून ठार मारण्यात आले. शिर कापून त्याचे प्रदर्शन करून हिंदूत घबराट उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला

असावा.

४. औरंगजेबनामा - खेमराज श्रीकृष्ण दास, पृ. ६६

संभा सन ११०० हिजरी , सवंत १७४६, सन १६८९ ई.

उस बेदिन का फसाद करना और मुसलमानोंके शहरोंको लुटना उसके जिंदा रखने से बढा हूआ था, इसलीये शरीयतवालो काजीओ और मुफतियो के फतवा (व्यवस्था) और दिनदौलतवालो (अमीर वजिरो) की सलाहसे उनको मारना वाजिब ठ्हरा ख इसलीये २१ जमादिउलअव्वल सन ३२ को कोरागाव (फतहाबाद) मे मुकाम होने के पिछे (चैतसुदि १ / १२ मार्च) को वह कवि कलशसमेत, जो सब जगह उसके साथ रहा था, काफरों की मारनेवाली तलवार से मारा गया.

५. औरंगजेब का इतिहास- जदूनाथ सरकार पृ. ६५२

मराठ्यांच्या राजाचे अपराध आता क्षमेच्या पलीकडे गेले होते. त्याच दिवशी संभाजीचे डोळे काढण्यात आले. आणि दुसऱ्या दिवशी कविकलस याची जीभ छटण्यात आली. मुसलमानांना ठार मारणे, कैद करणे आणि त्यांची अब्रू घेणे (हा शब्द बेइज्जत करणे या अर्थाने वापरला असावा.) व त्याचप्रमाणे इस्लामची शहरे लुटून फस्त करणे, या अपराधाबद्दल संभाजीला मृत्युची शिक्षा देण्यात यावी असा फतवा मुसलमान धर्ममार्तंडानी काढला. संभाजीला ठार करण्याच्या सुचनेला बादशहाणे संमती दिली. पंधरवडाभर कैदयाचे हाल हाल करण्यात आले. आणि त्यांचा वाटेल तसा अपमान करण्यात आला. त्यानंतर ११ मार्चला अतिशय क्रूरपणे आणि भयंकर हाल करून ठार मारण्यात आले. त्यांचे एक एक अवयव कुऱ्हाडीने तोडण्यात आले. आणि त्यांचे मास कुत्र्यापुढे फेकण्यात आले.

एकंदरीतच औरंगजेबाने राजेंची कशा प्रकारे हत्या केली हे स्पष्ट होते. हत्या झाली तो दिवस अमावस्येचा असून दुसऱ्या दिवशी गुढीपाडवा होता हे खरे असलेतरी हिंदु परंपरेनुसार एकच वर्ष दुखवटा म्हणून सण साजरा केला जात नाही. मात्र दुसऱ्या वर्षापासून साजरा केला जातो. शिवाय राजेंच्या हत्तेनंतर कुणाच्यातरी सांगण्यावरून गुढी उभा करण्याची प्रथा सुरू झाली हे साफ खोटे आहे.

महाराष्ट्रातील देश परदेशात विखुरलेले मराठी बांधव त्या त्या ठिकाणी कित्येक वर्षांपासून गुढीपाडवा साजरा करतात. त्यामुळे छत्रपती संभाजीराजेंची हत्या आणि गुढीपाडवा या दोन वेगवेगळ्या बाजू आहेत.

विशेष म्हणजे छत्रपतींच्या सातारा आणि कोल्हापूर येथील दोन्ही गाद्या व संभाजीराजेंच्या मामाचे गाव फलटणचे निंबाळकर घराणे दरवर्षी गुढी उभी करतात.

जाता जाता एकच अशाच प्रकारे सेनापती संताजी घोरपडेंची हत्या झाल्यानंतर औरंगजेबाने संताजीचे शिर भाल्यावर लटकाऊन सर्वत्र फिरविले होते. त्यावेळी कुठला सण साजरा केला? एवढे वाचल्यानंतर प्रत्येकाने ठरवावे की गुढी पाडव्याचा सण कसा साजरा करावा.

टिप - साडी वर उलटा तांब्या, लिंबाचा फांदी हे कृषीप्रधान संस्कृतीचे प्रतिक आहेत. तरीपण अशा निरर्थक प्रश्नाच्या उत्तरासाठी मा. आ.ह. साळुंकेसरांचे 'गुढी आणि शंकर पार्वती' हे पुस्तक पहावे. बरेच तथाकथित पुरोगामी साळुंकेसरांना आपला आदर्श मानतात, त्यांनीच आपल्या पुस्तकात गुढी ही पारंपरिक पद्धतीने उभी करावी म्हणून स्वतंत्र पुस्तक लिहिलेले आहे. त्याच्याही पुढे जाऊन कोणी गुढीला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करत असेल तर तो हिंदू धर्माचा अपमान आहे.

⌘ ⌘ ⌘

१४

गोरे मूल मारून टाकणारा आदिवासी

प्रा. डा॰. सतीश कदम

मलाया भाषेत हनुमानाला हंडूमान म्हणतात. हंडुमानपासून अंदमान नाव पडले. तर नग्न लोकांची वस्ती म्हणजे नेक्कावरम या शब्दावरून निकोबार शब्द आला. बंगालच्या उपसागरात जगापासून दूर ५७६ बेटांचा एक समूह असून पैकी २६ बेटांवर अंदमान तर १० बेटांवर निकोबार आहे. अशा ३६ बेटांवर मानवी वस्ती असणाऱ्या या भूभागाला 'अंदमान निकोबार' म्हटले जात असले तरी निकोबार हे अंदमानपासून २८० कि.मी. अंतरावरील स्वतंत्र बेट असून निकोबार बेटावर जाण्यास आता पर्यटकांना पूर्णपणे बंदी आहे. प्राचीन काळापासून येथील बेटांवर ओंगी, जारवा, शोंपिंग, सेंटिनल, ग्रेट अंदमानी आणि निकोबारी या सहा आदिवासी जमाती राहतात. अंदमान निकोबार हा भारताचा एक केंद्रशासित प्रदेश असून त्याचे प्रशासन उप-राज्यपालांच्या अखत्यारीत आहे. याचे क्षेत्रफळ ८२९३ चौरस मैल इतके असून ते दक्षिण अंदमान उत्तर अंदमान (मायाबंदर) आणि निकोबार अशा तीन जिल्ह्यातील ५६० गावात विभाजित केलेले आहे. रामायण काळात लंकेला जाण्यासाठी रामाणी याच बेटावरून सेतू बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्याचे स्थानिक लोक सांगतात. या बेटावरून लंका, इंडोनेशिया इत्यादी बेटावर जाण्याचा मार्ग असल्याने याला प्राचीनकाळी फार महत्त्व होते. ई.स. १०५० मधील तंजावर येथील एका शिलालेखात नेक्कावरम हा शब्द आलेला आहे. पुढे दुसऱ्या शतकात टॉलेमी, सातव्या शतकात इस्तीग, चौदाव्या शतकातील मार्कोपोलो तसेच चौदाव्या शतकातील फ्रायर ओडोरीक आदींच्या प्रवास वर्णनात या बेटांचा उल्लेख आलेला आहे. या बेटावर प्रथम पोर्तुगीज आणि फ्रेंचांनी काही दिवस आपले वर्चस्व निर्माण केले परंतु येथील प्रतिकूल वातावरणामुळे ते फार काळ थांबले नाहीत.

पुढे येथील आदिवासी चाचानी जहाजे लुटण्यास सुरुवात केली. भारतासह जगावर इंग्रजांचे राज्य सुरू झाले तेव्हा इ.स. १७८९ ला येथील आदिवासींवर विजय मिळवत एक पहिली मानवी वस्ती निर्माण करणारा इंग्रज अधिकारी अर्चिबिल्ड ब्लेअर या अधिकाऱ्याच्या नावावरून राजधानीला नाव पडले पोर्ट ब्लेअर.. अगदी सुरुवातीला अंदमानचे मुख्यालय इंग्रजांनी रॉस आयलंडवर ठेवलेले होते. येथील पेडॉकसारख्या १३० फूट लांब आणि ५-६ फूट रुंद वृक्षाच्या लाकडामुळे इंग्रजांनी अंदमानवर आपले लक्ष वळवले. त्यातून एक एक बेट सुधारत गेले. त्यामुळे आजही अंदमानमधील बेटांना रॉस, हॅवलॉक, निल अशी इंग्रज अधिकाऱ्यांची नावे आहेत.

वस्ती वाढविण्यासाठी इंग्रजांनी गंभीर गुन्हेगारांना येथे पाठविले. त्यातून एक मिश्र समाज तयार झाला. सोबत भव्य असे जेल बांधून भारतातील विविध कैद्यांना येथे ठेवले जायचे. तेथील क्रूर अत्याचारामुळे याला काळ्या पाण्याची शिक्षा म्हटले गेले. काळे पाण्याचा अर्थ - काल म्हणजे अंतिम वेळ. यानुसार काळापाणी म्हणजे अंतिम वेळी शेवटचे दिले जाणारे पाणी. या जेलमधील कैद्यांकडून इंग्रजांनी अनेक कामे करत तेथे सुधारणा घडवून आणल्या.

पुढे बंगाल,तामिळ, आंध्र अशा अनेक भागातून लोक याठिकाणी येऊन राहू लागले आणि त्यातूनच अंदमान मध्ये एक मिश्र समाज तयार झाला. मराठा समाजही तेथे मोठ्या प्रमाणावर असून त्यांची संख्या जवळपास २५०० इतकी आहे. यासाठी तेथे स्वतंत्र महाराष्ट्र मंडळही बांधलेले आहे. आज पर्यटनासाठी अंदमानसारखे दुसरे ठिकाण नाही. नीळा समुद्र त्यात ४० फुटांवर दिसणारा तळ, रंगीबेरंगी मासे, कोरल, समुद्री वनस्पती, जगातील सर्वात मोठा कासव (डामोचिलिया कोरोसी), सर्वात मोठा ३.३ फुटाचा खेकडा येथेच आढळतो. ८७% भूभाग हा जंगलांनी व्यापलेला असल्याने घनदाट जंगल असल्याने समुद्र किनारा असूनही गरम होत नाही. त्यामुळे जून ते सप्टेंबर सोडून आपण कधीपण अंदमानला जाऊ शकतो. येथे व्यावसायिक मच्छीमारीला बंदी असून शून्य टक्के प्रदूषण असल्याने बंदरावरील पाणी अतिशय निर्मळ असून राधानगरी बीच आशियातील सर्वात सुंदर बीच मानला जातो. नॉर्थ बे, रॉस, ह्यॅवलॉक, निल, स्मिथ, बाराटांग ही बेटे पाहण्यासारखी आहेत. तसेच इंग्रजांनी चालू केलेली अवाढव्य अशी लाकडाची मिल जरूर पाहावी अशीच आहे..

गोरे मूल मारून टाकणारा अंदमानातील आदिवासी जारवा .....

प्राचीन काळापासून येथील बेटावर ओंगी, जारवा, शोंपिंग,सेंटिनल, ग्रेट अंदमानी आणि निकोबारी या सहा आदिवासी जमाती राहतात. पैकी जारवा हीजमात ही मूळची आफ्रिकन वंशीय असून अंदमानवर त्यांचे वास्तव्य हे ५००० वर्षांपेक्षा जास्त असल्याचे मानले जाते. कालौघात या जमातीचे अस्तित्व धोक्यात आले असून त्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. १९११ च्या गणतीनुसार ओंगी १००, जारवा ५००, शोंपिंग २००, सेंटिनल उपलब्ध नाही, ग्रेट अंदमानी ४५ आणि निकोबारी ३०,००० एवढी राहिलेली आहे. पैकी जारवा ही जमात सर्वात चर्चेला आलेली जमात आहे. दक्षिण अंदमानात यांचे वास्तव्य असून अजूनही हे लोक पाषाण युगात वावरतात. त्यामुळे पूर्णपणे नग्न अवस्थेत राहून नारळपाणी, खेकडे, मासे, मध आणि डुकराचे मांस खाऊन गुजराण करतात. जारवा हीच त्यांची बोली भाषा असून त्यांना भारताचे कायदे लागू नाहीत, १९९० पर्यंत त्यांचा मानवी वस्तीशी फार काही संपर्क आलेला नव्हता. त्यानंतर पोर्ट ब्लेअर ते दिगलीपूरला जाणारा अंदमान ट्रंक रोड बनविताना जारवानी रस्त्यावर येऊन बाणांनी लोकांस मारण्यास सुरुवात केली तेव्हा याना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र त्यांना आपले अन्न पाणी मानवत नसल्याने ते विविध रोगाला बळी पडू लागले. एक जखमी झालेला मुलगा बरेच दिवस दवाखान्यात राहिल्याने त्यांनी हिंदी भाषा अवगत केली. त्यामुळे जारवा आता काही प्रमाणात जवळ येताना दिसतात. तरीपण त्यांचे कायदे कानून वेगळेच आहेत. एकपत्नित्व ही पद्धत आजही जपली जाते, संख्या कमी असली तरी ते आपापल्या टोळीनेच जंगलात राहतात. लहान मुलाला कुठलीही माता दूध पाजवते. जोडीदाराशिवाय इतर कुठलाही पुरुष परक्या स्त्रीकडे पाहू शकत नाही. एखादी स्त्री विधवा झाली तर तिचे मूल मारून टाकले जाते. आणि जारवात येथील बायकांना सर्वात मोठे टेन्शन म्हणजे गोरे मूल जन्माला येणे हे आहे. कारण जारवा हा मूळचा आफ्रिकन वंशाचा असल्याने जाड काळीभोर त्वचा आणि बसके नाक तसेच मोठे पण तजेलदार डोळे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. आणि यात चुकून फरक पडला आणि गोरे मूल झाले, तर ते दुसऱ्या वंशाचे समजून ते मारून टाकले जाते. काळे मूल जन्माला यावे यासाठी गर्भवतीला प्राण्याचे रक्तही पाजले जाते. अंदमानहून बाराटंगला निघाले की जराटांग या चेक पोस्टवर पास घेऊनच पुढे मिलिटरीच्या

गाड्या मागेपुढे ठेवतच इथला प्रवास करविला जातो. रस्त्याने जाताना जारवाची एखादी टोळी हमखास दिसतेच. काही मूर्खांनी त्यांना पान तंबाखू देऊन व्यसन लावल्याने ते मोठमोठ्याने पान मागत असतात. त्यांचे फोटो काढणे किंवा खायला देणे बंधनकारक असले तरी अति शहाणे ते देतातच. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. आता काही प्रमाणात ते कपडे घालतात. परंतु ते साफ करणे त्यांना माहीत नसल्याने आणखी नवीन रोगाला ते बळी पडत आहेत. काही असो, अंदमानमध्ये जाऊन जारवा पाहणे हा खरंच अतिशय वेगळा अनुभव आहे...

⌘ ⌘ ⌘